**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA**
**PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI**
**FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९०९०)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
B
Accredited By NAAC
Website : www.unishivaji.ac.in e-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

**एसयु/संलग्नता विभाग /२०१३-१४/२२** **दिनांक : ०४/०६/२०१३**

**तात्काळ**

**प्रति,**
**मा.प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व
मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

**विषय :- सी.एम.जे. विद्यापीठ, सिलाँग (मेघालय) येथून देण्यात आलेल्या बनावट पीएच.डी पदवी आधारे राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये करण्यात आलेल्या नेमणूका.**

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, उंच व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून ई-मेल द्वारा प्राप्त झालेले दि.०३/०६/२०१३ रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या सेवेत अध्यापक या पदावर सी.एम.जे. विद्यापीठ, मेघालय किंवा इतर खाजगी विद्यापीठे येथून पीएच.डी ही पदवी धारण करुन सेवेत रुजू झालेल्या व सेवेत कार्यरत असताना पीएच.डी धारण करुन, त्याअनुषंगाने वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणीत, निवड झालेल्या अध्यापकांची माहिती व खालील कागदपत्रे या कार्यालयास त्वरीत सादर करावीत.

१. संबंधित अध्यापकांचे पदवी व पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका सत्यप्रत.
२. संबंधित अध्यापकांचे पदवी व पदव्युत्तर पदवी (Degree) ची सत्यप्रत.
३. पीएच.डी पदवीची सत्यप्रत.
४. विद्यापीठ विहित निवड समितीच्या अहवालाची सत्यप्रत.
५. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या पत्राची सत्यप्रत.
६. विद्यापीठाने चेंजिस-इन-स्टाफ फॉर्मला मान्यता दिलेल्या पत्राची/प्रपत्राची सत्यप्रत.
७. वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी निवड झालेली माहिती.
८. आपल्या महाविद्यालयातील पीएच. डी. धारक अध्यापकांनी सी.एम.जे. विद्यापीठ व इतर खाजगी विद्यापीठाकडून पीएच. डी. साठी मार्गदर्शक म्हणून मान्यता घेतली असल्यास त्याची माहिती तसेच या पीएच. डी. मार्गदर्शकाकडे पीएच. डी. साठी नोंदणी झालेल्या उमेदवारांची नावासह संपूर्ण तपशील.

तरी सी.एम.जे. विद्यापीठातून पीएच.डी पदवी धारण केलेल्या अध्यापकांची माहिती तात्काळ ई-मेल/फॅक्सद्वारे या कार्यालयास सादर करावी. तसेच अशी माहिती निरंक असलेस तसा अहवाल त्वरीत पाठवावा. सदरची माहिती सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य/संचालक म्हणून आपली राहील, याची नोंद घ्यावी ही विनंती.

**सदरची माहिती शासनास वेळेत सादर करावयाची असल्याने प्राध्यान्याने ही माहिती पाठवावी.**

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

टीप :- सदरचे पत्र www.unishivaji.ac.in या संकेत स्थळावर BCUD-Circular या ठिकाणी उपलब्ध आहे.

D/Ash/Powar/Letters

महाराष्ट्र शासन

क्रमांक :- एफपीपी 2411/(प्र.क्र.259/13)/विशि-3
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई 400 032,
दिनांक : ३ जून 2013

प्रति,
कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे,

विषय :- C.M.J. विद्यापीठ, सिलाँग येथून देण्यात आलेल्या बनावट पीएचडी पदवी आधारे राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये करण्यात आलेल्या नेमणूका.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आज दिनांक 3 जून 2013 रोजी A,B.P. स्टार माझा या दूरचित्रवाणी वाहिनीवर राज्यातील विविध अकृषी विद्यापीठे व त्यांचे अंतर्गत महाविद्यालयांमध्ये सिलाँग येथून C.M.J. विद्यापीठातून पीएचडी च्या बोगस पदव्या प्राप्त करुन घेवून विद्यापीठे/महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांना सेवेत घेण्यात आलेले आहे, अशी बातमी दाखविण्यात येत आहे. ही अतिशय गंभीर आहे. अशा बोगस पदव्या प्राप्त करुन घेतलेल्या प्राध्यापकांच्या बाबतीत खालीलप्रमाणे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांची माहिती दिनांक 4 जून 2013 पूर्वी कोणत्याही परिस्थितीत शासनास सादर करण्यात यावी.

(अ) आपल्या विद्यापीठामध्ये अशा प्रकारे नियुक्त्या केलेल्या प्राध्यापकांची नांवे.

(ब) या प्राध्यापकांची नियुक्ती कोणी व केव्हा केली.

(क) अशा प्रकारे बोगस पीएचडी आधारे नियुक्त्या झाल्या असल्यास अशा नियुक्त्या तातडीने रद्द करण्यात याव्यात.

वरील बाबीस सर्व प्राथम्य देवून कार्यवाही करण्याचे निदेश आहेत.

आपला,

( गौ. जो. रसाळ )
सह सचिव,महाराष्ट्र शासन